# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

## इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शै. वर्ष २०१७-१८

## मुख्याध्यापकांसाठी सूचना

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये इयत्ता ११ वी प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. याबाबत विद्यार्थी व पालक यांच्यात जाणीव जागृती करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. सर्व मुख्याध्यापकांनी पुढील सूचनांनुसार आपल्या शाळेतील इ.१० वी च्या विद्यार्थी व पालकांची सभा दि. ३० मार्च २०१७ ते १० एप्रिल २०१७ या कालावधीत घेऊन इ.११ वी प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ विषयी सविस्तर माहिती शाळा स्तरावर देण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पुणे, पिंपरी चिंचवड व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रासह महाराष्ट्रातील नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक या महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमधील इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. सदरची प्रवेश प्रक्रिया शासन निर्णय ०७ जानेवारी २०१७ नुसार होणार आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी चे इयत्ता ११ वी चे कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचे तसेच किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमाचे (एमसीव्हीसी/एचएससी व्होकेशनल) सर्व प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होतील.

२) होम सायन्स, उर्दु, तेलगु, गुजराथी, हिंदी माध्यमाचे व रात्र शाळा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश ऑनलाईन पध्दतीने न होता संबधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर होतील. (फक्त पुणे विभागासाठी)

३) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश नियंत्रण व नियोजनासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राचे खालील प्रमाणे एकुण ०९ झोन केलेले आहेत.

i) पुणे शहर विभाग ii) कोथरुड , कर्वेनगर iii) स्वारगेट, पर्वती, धनकवडी iv) सिंहगड रोड v) कॅम्प, येरवडा vi) हडपसर vii) शिवाजीनगर, औंध,पाषाण viii) पिंपरी भोसरी ix) चिंचवड, निगडी

४) विद्यार्थ्यांनी इनहाऊस, अल्पसंख्यांक, व्यवस्थापन किंवा केंद्रीय प्रवेश पध्दतीने यापैकी कोणत्याही कोटयातील प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. म्हणजेच इयत्ता ११ वी प्रवेशासाठीच्या वेबसाईटवर प्रवेश अर्जाचा भाग-१ भरणे **सर्व विद्यार्थ्यांसाठी** अनिवार्य आहे सदरच्या नोंदणीसाठी लॉग-इन आयडी असलेली माहिती पुस्तिका घेणे आवश्यक आहे ही बाब पालकांना माहित करुन द्यावी. त्याबाबतचे वेळापत्रक एप्रिल २०१७ च्या शेवटच्या आठवडयात सूचना फलकावर लावले जाईल असे पालकांना सूचित करावे.

५) **दि. २७ मार्च २०१७ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचा** आयसीटी अनिवार्य विषयाचा पेपर असल्यामुळे तोपर्यंत विद्यार्थ्यांना सदरच्या प्रवेश प्रकिये विषयी आपल्या शाळेत होणा-या पालक विद्यार्थी यांच्या सभेविषयी वेळापत्रकाबाबत पूर्व सूचना आपल्यास्तरावरुन देण्यात याव्यात.

६) **दिनांक ३० मार्च २०१७ ते १० एप्रिल २०१७** या कालावधीत आपल्या शाळेतील शिक्षक पालक संघामार्फत इयत्ता १० वी तील सर्व विद्यार्थी व पालकांची सभा आयोजित करावी. सभेस उपस्थित पालकांच्या स्वाक्ष-या घेण्यात याव्यात व सदर सभेचा अहवाल आपल्या झोन केंद्र असणा-या कनिष्ठ महाविद्यालयाच्या झोन प्रमुखांकडे सादर करावा.

७) पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या सर्व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतून इयत्ता १० वी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रवेश अर्जाचा भाग-१ भरावयाचा आहे तसेच वैधानिक आरक्षणाबाबत जनरल रजिस्टरला असलेल्या नोंदी नुसार व आवश्यक कागदपत्रे तपासून आरक्षण बाबतचे अॅप्रुव्हल मुख्याध्यापकांनी त्यांच्या लॉग-इन मधून द्यावयाचे आहे, तसेच इतर आरक्षणाबाबत कागदपत्रे तपासून त्याप्रमाणे आरक्षणा बाबतचे अॅप्रुव्हल मुख्याध्यापकांनी त्यांच्या लॉग-इन मधून द्यावयाचे आहे, आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यां व्यतिरिक्त तसेच महानगरपालिका क्षेत्राबाहेरील शाळेतील तसेच दुस-या जिल्हयातील , राज्यातील, देशाबाहेरील तसेच अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे भाग-१ भरणे व अॅप्रुव्हल देणे हे काम झोन निहाय मार्गदर्शन केंद्रावर केले जाईल, त्याबाबतचे सविस्तर वेळापत्रक व सूचना वेळोवेळी जाहिर केल्या जातील.

८) माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांवर आपल्या शाळेतील इयत्ता १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी ऑनलाईन फॉर्म (भाग-१) भरणे व अॅप्रुव्हल देणे ही महत्त्वाची जबाबदारी असल्यामुळे ते काम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व नियोजन करावे, याबाबत पालकांची तक्रार आल्यास संबधित मुख्याध्यापकांना जबाबदार धरुन त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

९) गतवर्षी असेही निदर्शनास आले की, माध्यमिक शाळा स्तरावर योग्य सहकार्य न मिळाल्याने विद्यार्थ्यांना सायबर कॅफे मधुन फॉर्म भरावा लागला तसेच आरक्षणासंदर्भात शाळा प्रमुखांनी ऑनलाईन अॅप्रुव्हल देणेबाबत पालकांची दिशाभूल केल्यामुळे इ. ११ वी प्रवेश अर्ज भरण्यासाठी गैरसोय झाल्याने विद्यार्थी व पालकांना मनस्ताप सहन करावा लागला. त्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

१०) यावर्षी पुणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र राज्य मंडळाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म भरणेबाबतची प्रक्रिया त्यांच्याच शाळेतुन केली जाणार आहे, केवळ या क्षेत्राबाहेरील तसेच अन्य बोर्डांच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्राची व्यवस्था केली जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक मुख्याध्यापकाने आपल्या शाळेतील इ.१० वी तील मार्च २०१७ बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याचे काम विहित मुदतीत नियमानुसार पुर्ण करावयाचे आहे, त्याबाबतचा कार्यवाही अहवाल वेळोवेळी सादर करावा लागणार आहे.

११) सदरच्या कामासाठी एकूण फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे मानधन अदा करणेत येईल.

१२) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-२ (ऑप्शन फॉर्म/पसंतीक्रम) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ. १० वी च्या ऑनलाईन निकालानंतर भरावयाचा आहे. त्याबाबतचे वेळापत्रक वेळोवेळी जाहिर केले जाईल.

१३) सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेतून इयत्ता १० वी साठी प्रविष्ट झालेल्या नियमित, पुनर्परीक्षार्थी व खाजगी विद्यार्थ्यांची (१७ नं चा फॉर्म भरलेले विद्यार्थी ) संख्या विचारात घेवून वर नमुद संपर्क शाळेकडे <u>**दि.१०.०४.२०१७**</u> पर्यंत माहितीपुस्तिकेची मागणी पत्राद्वारे नोंदवावी.

१४) माहिती पुस्तिका वितरण करण्यापूर्वी प्रवेश प्रक्रियेसंबधी सविस्तर सूचना व कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच झोननिहाय मुख्याध्यापक व तंत्र सहाय्यक यांचे प्रशिक्षण , पालक व विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग घेण्यात येतील.

१५) विद्यार्थी व पालकांनी पुढील माध्यमातून इयत्ता ११ वी च्या प्रवेश प्रक्रियेबाबत सूचना पाहण्याचे मार्गदर्शन आपल्या स्तरावरुन करण्यात यावे.

अ) शिक्षण उपसंचालक कार्यालय वेबसाईट **www.dydepune.com**

ब) ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करणा-या एजन्सीची वेबसाईट www.11thadmission.net आहे, सदरचे संकेतस्थळ दि. २४.०३.२०१७ पासून सुरु होईल याची नोंद घ्यावी.

क) स्थानिक वर्तमानपत्रातील इ. ११ वी प्रवेशा संदर्भातील बातम्या/माहिती व इतर प्रसार माध्यमे.

ड) शाळेची वेबसाईट (असल्यास)

इ) शाळेचा दूरध्वनी क्रमांक अथवा प्रवेशासाठी स्थापन केलेला कक्ष अथवा जबाबदार शिक्षक किंवा कर्मचारी

१६) सदर प्रवेश प्रक्रियेसाठी झोन निहाय झोन केंद्र खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | झोन चे नांव | झोन क्रमांक | झोन केंद्र |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | **१** | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, सदाशिव पेठ, पुणे-३० |
| २ | कोथरुड, कर्वेनगर | **२** | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे |
| ३ | स्वारगेट, पर्वती, धनकवडी | **३** | श्री. शाहु मंदिर महाविद्यालय, पर्वती पुणे |
| ४ | सिंहगड रोड | **४** | वसंतराव सखाराम सणस माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, वडगांव खुर्द, पुणे |
| ५ | कॅम्प, येरवडा | **५** | नौरोसजी वाडिया कॉलेज, पुणे |
| ६ | हडपसर | **६** | आकुताई कल्याणी गर्ल्स ज्युनिअर कॉलेज माळवाडी, हडपसर, पुणे-२८ |
| ७ | शिवाजीनगर, औंध, पाषाण | **७** | मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे |
| ८ | पिंपरी, भोसरी | **८** | जयहिंद कॉलेज, पिंपरी |
| ९ | चिंचवड, निगडी | **९** | श्री म्हाळसाकांत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी |

१७) शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१८) इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती पाठविण्यासाठी या कार्यालयाच्या **11thonlineadmissiondydpune@gmail.com** या ई-मेल आयडी वर माहिती सादर करावी.

**(दिनकर टेमकर)**
**अध्यक्ष**
**इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती**
**तथा**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे-१**